# Savitribai Phule Pune University
(Formerly University of Pune)
## Department of Dr. Babasaheb Ambedkar Studies

Department of Dr. Babasaheb Ambedkar Studies
Dr. Babasaheb Ambedkar Bhavan
Savitribai Phule Pune University
Ganeshkhind,Pune-411007 (India)
Phone : 020-25621485
Telefax : 25621485
E-mail : directorasc@unipune.ac.in


Ref. No. : SPPU/DBAS/ 18|2022 Date 16/03/2022

## जाहीर प्रकटन

**'डॉ. बाबासाहेब आंबेडकर सर्वोत्कृष्ट ग्रंथ, सर्वोत्कृष्ट सामाजिक कार्यकर्ता, सर्वोत्कृष्ट संशोधक पुरस्कार — शैक्षणिक वर्ष २०२१—२०२२ साठी अर्ज सादर करणेबाबत '**

याद्वारे सर्वांना कळविण्यात येते की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा प्रसार व प्रचार राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय पातळीवर अधिक व्यापक पध्दतीने होणेकरिता शैक्षणिक वर्ष २०२१—२०२२ करिता **'डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीदिनी (दिनांक १४ एप्रिल रोजी)'** पुढील तीन पुरस्कार डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्टडीज विभागाच्या वतीने प्रत्येकी रक्कम रूपये ५,०००/— मानधन, सन्मानचिन्ह आणि प्रमाणपत्र याप्रमाणे प्रदान करण्यात येणार असून त्यासाठी सोबत जोडलेल्या निकषांनुसार आणि नमुन्यात **मंगळवार, दिनांक ५ एप्रिल, २०२२ पर्यंत** अर्ज मागविण्यात येत आहेत.

१) **''डॉ. बाबासाहेब आंबेडकर सर्वोत्कृष्ट ग्रंथ पुरस्कार''**

२) **''डॉ. बाबासाहेब आंबेडकर सर्वोत्कृष्ट सामाजिक कार्यकर्ता पुरस्कार''**

३) **''डॉ. बाबासाहेब आंबेडकर सर्वोत्कृष्ट संशोधक पुरस्कार''**

<u>महत्त्वाच्या सूचना :</u>

१. उपरोक्त पुरस्कारासाठीचे अर्ज आवश्यक त्या कागदपत्रांसह **<u>मंगळवार, दिनांक ५ एप्रिल, २०२२ पर्यंत मा. विभागप्रमुख, डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्टडीज विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे – ४११ ००७</u>** येथे कार्यालयीन वेळेमध्ये सादर करावेत.

२. प्रत्येक पुरस्कारासाठी स्वतंत्रपणे अर्ज आवश्यक त्या कागदपत्रांसह सादर करणे आवश्यक आहे.

३. उपरोक्त पुरस्कारांसाठी व्यक्तींची निवड करणे व त्यासंबंधीचे सर्व अधिकार संबंधित निवड समिती आणि सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठास असतील.

याची कृपया नोंद घेण्यात यावी.

16/3/2022

**(डॉ. विजय खरे)**
**प्राध्यापक व विभागप्रमुख**

HOD
Department of Dr. Babasaheb Ambedkar Studies
Savitribai Phule Pune University
Pune - 411 007.

<u>सोबत :</u> वरीलप्रमाणे.

# पुरस्कारांसाठीचे निकष

## १) पुरस्काराचे नांव : ''डॉ. बाबासाहेब आंबेडकर सर्वोत्कृष्ट ग्रंथ पुरस्कार''

### पुरस्कारासाठीचे निकष :

१) गेल्या ३ वर्षात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनावर, चरित्रावर, लेखनावर, चळवळीवर, सामाजिक कार्यावर व इतर विषयावर ग्रंथ लिहिलेला असला पाहिजे.

२) संबंधित ग्रंथाला ISBN क्रमांक असावा. संबंधित ग्रंथाला ISBN क्रमांक नसल्यास संबंधित ग्रंथाची गुणवत्ता समिती पाहील.

३) सदर पुरस्कारासाठी संबंधित ग्रंथाच्या लेखकास, प्रकाशकास तसेच संबंधित ग्रंथाच्या लेखक व प्रकाशकाशिवाय नामांकित व्यक्तीस, अभ्यासकास नामनिर्देशन करता येईल.

४) सदर पुरस्कारासाठीच्या ग्रंथाचा शोध समिती घेऊ शकेल तसेच संबंधित ग्रंथ समितीद्वारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्टडीज विभागाच्या अर्थशीर्षातून खरेदी करण्यात येईल व सदर समितीस सदरहू ग्रंथाचे सदर पुरस्कारासाठी नामनिर्देशन करता येईल.

५) सदर पुरस्कारासाठी ज्या ग्रंथाची निवड करण्यात येईल अशा ग्रंथास सदर पुरस्कार प्रदान करण्यासंदर्भातील संबंधित लेखक, प्रकाशक इ. ची संमती घेण्यात येईल.

६) सदर पुरस्कार दरवर्षी 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीदिनी (दिनांक १४ एप्रिल रोजी)' प्रदान करण्यात येईल.

७) सदर पुरस्कारासाठी संबंधित वर्षी प्राप्त झालेल्या अर्जापैकी सदर पुरस्कारासाठी निवड न झालेले अर्ज हे त्यापुढील वर्षा देण्यात येणाऱ्या सदर पुरस्कारासाठी विचारात घेण्यात येतील.

८) सदर पुरस्कारासाठी लेखकाने/नामनिर्देशित व्यक्तीने संबंधित ग्रंथाच्या २ मूळ प्रती विहित नमुन्यातील अर्जासह मा. विभागप्रमुख, डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्टडीज विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे — ४११ ००७ यांचेकडे विहित मुदतीत सादर करणे आवश्यक आहे.

## २) ''डॉ. बाबासाहेब आंबेडकर सर्वोत्कृष्ट सामाजिक कार्यकर्ता पुरस्कार''

पुरस्कारासाठीचे निकष :

१) सदर पुरस्कारासाठी अर्ज करणारी/नामनिर्देशित करण्यात येणारी व्यक्ती ही छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा जोतिराव फुले, राजर्षी शाहू महाराज, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर व इतर थोर व्यक्तींच्या विचारांवर सामाजिक कार्य केलेले असावे अथवा सदरहू व्यक्ती सदरहू विचारांवर कार्य करीत असावी.

२) सदर पुरस्कारासाठी संबंधित व्यक्तीस स्वत:चे तसेच नामांकित व्यक्तीस, अभ्यासकास, सामाजिक कार्यकर्त्यास एखाद्या व्यक्तीचे नामनिर्देशन करता येईल.

३) सदर पुरस्कारासाठीच्या व्यक्तीचा सदर समिती शोध घेऊन सदर पुरस्कारासाठी नामनिर्देशन करू शकेल.

४) सदर पुरस्कारासाठी निवड करण्यात येणाऱ्या व्यक्तीची संमती घेण्यात येईल.

५) सदर पुरस्कार दरवर्षी 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीदिनी (दिनांक १४ एप्रिल रोजी)' प्रदान करण्यात येईल.

६) सदर पुरस्कारासाठी संबंधित वर्षी प्राप्त झालेल्या अर्जांपैकी सदर पुरस्कारासाठी निवड न झालेले अर्ज हे त्यापुढील वर्षा देण्यात येणाऱ्या सदर पुरस्कारासाठी विचारात घेण्यात येतील.

७) सदर पुरस्कारासाठीचे अर्ज हे विहित नमुन्यात मा. विभागप्रमुख, डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्टडीज विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे – ४११ ००७ यांचेकडे विहित मुदतीत सादर करणे आवश्यक आहे.

## ३) ''डॉ. बाबासाहेब आंबेडकर सर्वोत्कृष्ट संशोधक पुरस्कार'':

पुरस्कारासाठीचे निकष :

१) सदर पुरस्कारासाठी अर्ज करणाऱ्या/नामनिर्देशित करण्यात येणाऱ्या व्यक्तीचे वय वर्षे २५ ते ४५ असावे.

२) सदर पुरस्कारासाठी अर्ज करणाऱ्या/नामनिर्देशित करण्यात येणाऱ्या व्यक्तीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारधारेशी संबंधित संशोधन कार्य केलेले असले पाहिजे.

३) सदर पुरस्कारासाठी संबंधित व्यक्तीस/संशोधकास स्वत:चे तसेच नामांकित व्यक्तीस, अभ्यासकास एखाद्या व्यक्तीचे/संशोधकाचे नामनिर्देशन करता येईल.

४) सदर पुरस्कारासाठीच्या व्यक्तीचा/संशोधकाचा सदर समिती शोध घेऊन सदर पुरस्कारासाठी नामनिर्देशन करू शकेल.

५) सदर पुरस्कारासाठी निवड करण्यात येणाऱ्या व्यक्तीची/संशोधकाची संमती घेण्यात येईल.

६) सदर पुरस्कार दरवर्षी 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीदिनी (दिनांक १४ एप्रिल रोजी)' प्रदान करण्यात येईल.

७) सदर पुरस्कारासाठी संबंधित वर्षी प्राप्त झालेल्या अर्जापैकी सदर पुरस्कारासाठी निवड न झालेले अर्ज हे त्यापुढील वर्षा देण्यात येणाऱ्या सदर पुरस्कारासाठी विचारात घेण्यात येतील.

८) सदर पुरस्कारासाठीचे अर्ज हे विहित नमुन्यात मा. विभागप्रमुख, डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्टडीज विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे – ४११ ००७ यांचेकडे विहित मुदतीत सादर करणे आवश्यक आहे.